# दि. १०/१०/२०१८ रोजी व त्यानंतर महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रणालीत प्राप्त होणारे अर्ज

## ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया

## (अर्जदाराने पूर्ण करावयाची कार्यपध्दती)

**STEP 1**



अर्जदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्यापूर्वी तेथे उपलब्ध असलेले माहिती पत्रक व मार्गदर्शिका वाचावी.

**STEP 2**



सर्वप्रथम पूर्व पडताळणी अर्ज स्क्रीनवर येईल. अर्जदाराने दिलेली विधाने वाचून मान्य करणे आवश्यक आहे. त्यानंतरच ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरु करता येईल.

**STEP 3**



त्यानंतर वैयक्तिक माहितीचा तपशील स्क्रीनवर येईल. अर्जदाराने त्याचा वैयक्तिक माहितीचा तपशील भरावयाचा आहे. वैयक्तिक माहितीसोबत स्वतः चा भ्रमणीध्वनी क्रमांक व ईमेल आयडी द्यावयाचा आहे. Login ID व Password अर्जदाराच्या भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडीवर पाठविला जाईल व माहिती भरल्यानंतर OTP प्राप्त होईल.

**STEP 4**




पुढील पानावर प्राप्त OTP टाकून त्याची तसेच भ्रमणध्वनी व ईमेल आयडी यांची पडताळणी अर्जदाराने करावयाची आहे.

**STEP 5**



OTP ची पडताळणी झाल्यावर अर्जदारास Login ID व password टाकून ऑनलाईन नोंदणीची पुढील प्रक्रिया सुरु करावयाची आहे.

**STEP 6**



त्यानंतर अर्जदाराने वास्तव्याचा (मूळ/स्थानिक) पत्ता, व्यवसायाचा पत्ता (असल्यास) व शैक्षणिक अर्हतेसंबंधीचा तपशील भरावयाचा आहे व पुढे कागदपत्रे upload करावयाची आहेत.

**STEP 7**




अर्जदाराने त्याचा फोटो व सही jpg किंवा jpeg format मध्ये दिलेल्या साईजमध्ये upload करावयाचा आहे. अर्जदाराने नोंदणीकरीता शैक्षणिक अर्हतेसंबंधीची व इतर आवश्यक कागदपत्रे फक्त pdf format मध्ये दिलेल्या साईजमध्ये upload करावयाची आहेत.

* अर्जदार download section मधून undertaking (हमीपत्र)download करेल. त्याचे प्रिंटआऊट घेऊन , वाचून प्रत्येक कागदावर सही करेल व त्यानंतर ते इतर कागदपत्रांसोबत न चुकता upload करेल. तसेच अर्जदार Identity Slip download करेल. त्याचे प्रिंट घेऊन, त्यावर फोटो चिकटवून , सही करून ज्या महाविद्यालयातून फार्मसी शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून साक्षांकीत करून upload करेल.

**STEP 8**



त्यानंतर फी संबंधीचा तपशील स्क्रीनवर येईल. अर्जदारास भरावयाच्या फीची एकूण रक्कम दर्शविली जाईल. अर्जदाराने खाली दिलेल्या लिंकवर SBI Portal द्वारे ऑनलाईन फी भरावयाची आहे.
https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm?corpID=845584

**STEP 9**



ऑनलाईन फी भरल्यानंतर त्याचा तपशील भरण्याकरीता अर्जदाराने Login करावयाचे आहे व अर्ज निश्चित करण्यासाठी पुढे जायचे आहे (आवश्यक) अर्जदाराने फी भरल्यानंतर भविष्यातील संदर्भाकरीता फी ची पावती प्रिंट करून ठेवावी

मागे पहा ........

**STEP 10** 


अर्जदाराने पुनश्च Login Id व Password टाकून अर्ज निश्चित /अंतिम (confirm)करावा.

**STEP 11** 

अर्ज मान्य (confirm) झाला आहे याची खातरजमा केल्यानंतर अर्जदाराने त्याच्या ऑनलाईन अर्जाची प्रत (prinout) काढून भविष्यातील संदर्भाकरीता ठेवावी.

## ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया

**(दि. १०/१०/२०१८ रोजी व त्यानंतर प्राप्त अर्ज - कार्यालयाकडून करावयाची कार्यवाही)**

- ❖ अर्जदाराकडून ऑनलाईन भरलेले सर्व प्राप्त अर्जांचे संकलन
- ❖ अर्जदाराने ऑनलाईन फी भरल्याची बँकेकडून खातरजमा

<u>अर्ज व सहपत्रांची तपासणी / छाननी</u>

↓

<u>फार्मसी महाविद्यालयांची कार्यवाही</u>

महाविद्यालये त्यांना परिषदेने दिलेल्या Login Id चा वापर करून अर्जदाराच्या अंतिम वर्षाची गुणपत्रिका व कॉलेज सोडल्याचा दाखला पाहू शकतील. अर्जदाराच्या शैक्षणिक अर्हतेस महाविद्यालयांनी लवकरात लवकर अथवा सात कार्यालयीन दिवसांत पुष्टी द्यावी अशी विनंती त्यांना केली आहे.

<u>परिषदेकडून होणारी कार्यवाही</u>

परिषदेतर्फे सर्व upload झालेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल व ते सर्व योग्य असल्यास अर्ज online प्रणालीत पुढे मान्यतेसाठी पाठविला जाईल. एक किंवा अधिक कागदपत्रे आवश्यक यादीनुसार नसतील तर योग्य ते कागदपत्र upload करण्यासाठी अर्ज अर्जदाराकडे (revert) परत पाठवला जाईल.

- ❖ वरील तपासणी/ छाननी प्रक्रियेअंती कायदेशीर बाबींची सर्वकष पूर्तता करणारे अर्ज मान्य करुन नोंदणीस मान्यता (Approved)
- ❖ मान्य झालेल्या अर्जांस पंजीकरण क्रमांक (Registration No.) प्रदान करणे
- ❖ अर्जदारास पंजीकरण क्रमांक (Registration No.) प्राप्त झाल्याबाबत एसएमएसद्वारेव ईमेल द्वारे माहिती
- ❖ परिषदेकडून पंजीकरण दाखला व पीपीपी कार्डची छपाई करून स्पीड पोस्टने पंजीकरण दाखला व पीपीपी कार्ड पाठविण्यात येईल.

---

- ❖ अर्जदार आपल्या Login ID व password चा वापर करुन प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट (provisional certificate) प्रिंट करू शकतो व त्याचा वापर करू शकतो. (वैधता अंतिम पंजीकरण प्रमाणपत्र मिळेपर्यन्त)

Note :- The **provisional certificate** would be **valid** as long as the Final Registration Certificate is not issued, and as soon as **Final Registration Certificate** is issued the **provisional certificate** loses its sanctity.

**The above flow chart and activities mentioned are tentatively designed and for reference purpose. MSPC reserves all rights to make changes as and when necessary without intimation)